# आठवणीतल्या गाण्यांची बहारदार मैफल

## अभ्यासपूर्ण निवेदनातून उलगडले मराठी भावसंगीताचे पैलू

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

मराठी भावसंगीत समृद्ध करणाऱ्या कालखंडाचे विविध टप्पे, या प्रवासाला अलौकिक प्रतिभेने सजविणारे ज्येष्ठ कलावंत आणि संगीतप्रेमींनी सदैव आठवणीत जपलेली गाणी अशी आगळी मैफल मंगळवारी मैत्र संकुल उपक्रमात रंगली.

साहित्य संस्कृती



व्यंकटेश माडगूळकर प्रतिष्ठानच्या मैत्र संकुल उपक्रमात बुधवारी मराठी भावसंगीताचा प्रवास उलगडला. सुलभा तेरणीकर, शुभांगी मुळे, अविनाश सलगरकर, मोहन पारसनीस यांच्या सादरीकरणाला दाद मिळाली.

व्यंकटेश माडगूळकर प्रतिष्ठानतर्फे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जेष्ठ सिनेअभ्यासक सुलभा तेरणीकर यांच्या भावपूर्ण निवेदनातून मराठी भावसंगीताचे पैलू उलगडले. गायिका शुभांगी मुळे आणि अविनाश सलगरकर यांच्या गायकीने ही मैफल रंगली. त्यांना तितकीच समर्पक साथ मोहन पारसनीस (तबला) आणि सलगरकर (हार्मोनिअम) यांनी केली.

'विनायका हो सिद्धगणेशा', 'मर्मबंधातली ठेव ही', 'अरे संसार संसार', 'कबीराचे विणतो शेले, कौसल्येचा राम बाई', 'बाई मी विकत घेतला शाम', 'घननीळा लडीवाळा, झुलवू नको हिंदोळा' या रचनांना उपस्थितांची दाद मिळाली. पं. भास्करबुवा बखले, मास्टर विनायक, पं. दीनानाथ मंगेशकर, केशवराव भोळे अशा दिग्गजांचं योगदान, लता मंगेशकर, आशा भोसले, सुधीर फडके यांच्या उदयापासून भावसंगीताच्या प्रवासाची माहिती तेरणीकर यांनी सांगितली.

प्रतिष्ठानच्या कार्यकारी विश्वस्त ज्ञानदा माडगूळकर-नाईक, ज्येष्ठ गायिका अनुराधा मराठे, संयोजक मनोज पटवर्धन आदी या वेळी उपस्थित होते.

या कार्यक्रमात सादर करण्यात आलेल्या गाण्यांना आणि अभ्यासपूर्ण निवेदनाला रसिक श्रोत्यांनी मोठ्या प्रमाणावर दाद दिली.